MHAH220002212025

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल तारीख | २३ | ०१ | २०२० |
| नोंदणी तारीख | २३ | ०१ | २०२० |
| | २४ | १२ | २०२५ |
| निकाल तारीख | १७ | ०३ | २०२६ |
| कालावधी | ०६ वर्षे | ०१ महिना | २२ दिवस |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.२) यांचे न्यायालय, कर्जत.

(आर. बी. राऊत, पिठासीन अधिकारी)

**नियमित फौजदारी खटला क्र.४०१/२०२५** **नि.क्र.४६**

**गुन्हा रजिस्टर क्र. ६५०/२०१९, कर्जत पोलीस स्टेशन**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | : | **महाराष्ट्र शासनतर्फे,**<br>प्रभारी अधिकारी,<br>कर्जत पोलीस स्टेशन,<br>कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |
| अभियोगपक्षातर्फे | | सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एन. आर. वाघ |
| **आरोपी** | १ | **ज्ञानेश्वर पंडीतराव पंडीत**<br>वयः ४३ वर्षे, व्यवसायः शेती<br>रा. मिरजगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर |
| आरोपींतर्फे | : | विधिज्ञ श्री. एच. डी. महामुनी |

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of offence) | २६/१२/२०१९ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | २६/१२/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of Chargesheet) | २३/०१/२०२० |
| दोषारोप/प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक<br>(Date of framing of Charge/Particular) | २४/१२/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक<br>(Date of commencement of Evidence) | २४/१२/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक<br>(Date on which Judgment is reserved) | युक्तीवाद ऐकल्यानंतर तात्काळ न्यायनिर्णय देण्यात आला. |

| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of the Judgment) | १७/०३/२०२६ |
|---|---|
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of sentencing Order, if any) | – |

| अ.क्र. (Rank of the accused) | आरोपीचे नाव (Name of accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of release on bail) | कलम (Offence charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentence imposed) | न्यायाधीन बंदी असल्याची तारीख कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वर पंडीतराव पंडीत | – | २३/०१/२०२० | भा.दं.वि. कलम ३४१, ५०४ व ५०६ | निर्दोष | – | – |

## न्यायनिर्णय

(दिनांक १७/०३/२०२६ रोजी पारित )

प्रस्तुत खटला आरोपीं विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३४१, ५०४ व ५०६ नुसार शिक्षा पात्र गुन्ह्याकरिता अभियोगपक्षातर्फे दाखल करण्यात आला व त्यामध्ये संपरिक्षा करण्यात आली.

२. अभियोगपक्षाचे संक्षिप्त कथन असे आहे की, दिनांक २६/१२/२०१९ रोजी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास मौजे मिरजगाव गावात जुनी पोस्ट गल्ली येथील सार्वजनिक रस्त्यावर, ता. कर्जत येथे फिर्यादी हा खाजगी कामासाठी जात असताना त्याठिकाणी सार्वजनिक रस्त्यावर आरोपी आला व फिर्यादीला आडवा होऊन म्हणला की हा रस्ता त्याच्या मालकीचा आहे, या रस्त्याने जायचे नाही व फिर्यादीला ढकलुन दिले व रस्ता आडवुन सार्वजनिक रस्त्यावरुन जाण्यास प्रतिबंध केला व शिवीगाळ दमदाटी करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने सदरील घटनेबाबत पोलीस स्टेशन, कर्जत येथे आरोपींविरुद्ध फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीने कथित घटनेच्या दिलेल्या फिर्यादवरुन ठाणे अंमलदार यांनी गुन्हा क्र.६५०/२०१९ नोंदविला.

३. तपासी अंमलदाराने तपासाच्या दरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले,

घटनास्थळ पंचनामा केला व तपासांती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी विरुध्द नि.क्र.४१ प्रमाणे भारतीय दंड विधान कलम ३४१, ५०४ व ५०६ अन्वये दोषारोप ठेवला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन खटला चालविण्याची विनंती केली. आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळून न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

५. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. आर. वाघ आणि आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एच. डी. महामुनी यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रकरणात दाखल कागदोपत्री पुरावा यांचा विचार करता माझ्यासमक्ष खालील मुद्दे प्रकरणाच्या निर्णयासाठी विचारार्थ आहेत. सदर मुद्यावर कारणमीमांसेसह माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, दिनांक २६.१२.२०१९ रोजी सकाळी १०.३० वाजताचे सुमाराम मौजे मिरजगाव, जुनी पोस्ट गल्ली येथे फिर्यादी घरुन गावामध्ये जात असताना त्याठिकाणी आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर फिर्यादीला आडवे येऊन म्हणाला की, 'तु या रस्त्यावरुन जायचे नाही, हा रस्ता माझ्या मालकीचा आहे' व फिर्यादीला सार्वजनिक रस्त्याने जाण्यास चुकीच्या पध्दतीने प्रतिबंध केला व त्याला स्वेच्छेने रोखले व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३४१ प्रमाणे अपराध केला ? | नकारार्थी. |
| २. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानित केले जेणेकरुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य घडेल व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०४ प्रमाणे अपराध केला ? | नकारार्थी. |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला दमदाटी करुन जिवे मारण्याची धमकी दिली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०६ अन्वये अपराध केला ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी केवळ १ साक्षीदार तपासला आहे. साक्षीदार क्र.१ अनुराधा दिलीप चुंभळकर हिची साक्ष नि.क्र.४४ वर नोंदविण्यात आली आहे.

**मुद्दे क्र.१ ते ३ करिता**

७. वरील सर्व मुद्दे एकाच घटनेशी संलग्न असल्यामुळे मी त्यांना एकत्रीतपणे चर्चेसाठी घेत आहे.

८. साक्षीदार क्र.१ फिर्यादीची पत्नी अनुराधा दिलीप चुंभळकर हिने तिच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, दि. २६/१२/२०१९ रोजी काय घटना घडली होती हे तिला माहिती नाही. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, असे काही घडले नाही की, तिचे पती हे घरुन गावात जात असताना ज्ञानेश्वर पंडीत याने त्याला अडवले, ढकलुन दिले व जिवे मारण्याची धमकी दिली. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना फिर्यादीची उलटतपासणीच्या स्वरुपात सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली, परंतु फिर्यादीला विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांची फिर्यादीने नकारार्थी उत्तरे दिली. सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान मान्य केले आहे की, तिचे पती दिलीप हे फिर्यादी असुन ते मयत झालेले आहेत व तिचे सासरे खुप आजारी असल्यामुळे ते साक्षकामी न्यायालयात येऊ शकत नाहीत व त्यांची साक्षी त्यांना घ्यायची नाही, आरोपी व त्यांचे न्यायालयाबाहेर मिटले आहे, त्यांना केस चालवायची नाही. फिर्यादीने त्यांच्या पुराव्यात आरोपीविरुद्ध काहीही कथन केलेले नाही.

९. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी दिलीप प्रभागर चुंबळकर याची साक्ष महत्वाची होती, परंतु सदर फिर्यादी साक्षीदार मयत आहे. फिर्यादीची पत्नी साक्षीदार क्र. १ अनुराधा दिलीप चुंभळकर हिची नि.क्र.४४ खाली साक्षी नोंदवण्यात आली. परंतु सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केले नाही. फिर्यादी मयत असल्यामुळे फिर्यादमधील मजकूर सिध्द झालेला नाही. आरोपीने गुन्हा केला याबाबत इतर

कोणताही कागदोपत्री किंवा तोंडी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द करण्यास पात्र नाही. फिर्यादीच्या पत्नीने असे देखील मान्य केले आहे की, आरोपी व त्यांच्यात न्यायालयाबाहेर समझोता झाला आहे, आरोपीविरुध्द तिची कोणतीही तक्रार राहीलेली नाही, आरोपीविरुध्द सदरचा खटला त्यांना पुढे चालवायचा नाही असे दिसुन येते. फिर्यादीतर्फे साक्षीदार व आरोपीतर्फे नि. क्र. ४३ वर तडजोड पुरसिस दाखल केली आहे. मुळ फिर्यादीतर्फे साक्षीदार यांनी नि.क्र.४५ वर सदर खटल्यामध्ये पुरावा देणे नाही पुरसिस दिली आहे. मुळ फिर्यादी मयत आहेत. यावरून मुळ फिर्यादी तर्फे साक्षीदार व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे स्पष्ट दिसून येते. अभियोग पक्षाने आरोपीवर केलेले आरोप व दोषारोप सबळ पुराव्याआधारे सिध्द केलेले नाहीत. तसेच आरोपी व फिर्यादीतर्फे साक्षीदार यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. प्रस्तुत प्रकरणात इतर साक्षीदार तपासलेले नसल्याने व फिर्यादीतर्फे साक्षीदार यांनी दिलेल्या उलटतपासातील कबुली जबाबानुसार आरोपींविरुध्दचा गुन्हा शाबीत होणे इतपत ठोस पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. त्यामुळे आरोपींना दोषी धरता येणार नाही. म्हणुन आरोपी हे सदर खटल्यातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. वरील सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **ज्ञानेश्वर पंडीतराव पंडीत** याची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम ३४१, ५०४ व ५०६ नुसार शिक्षा पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक व जमानत पत्र रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपीने १५,०००/- रू. चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढ्याच रकमेचा जामीन मुचलका द्यावा.

[न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.]

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.17 18:26:35 +0530

दिनांकः १७/०३/२०२६.

(आर. बी. राऊत)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत.
(न्यायालय क्र.२)

# सूची–I

## अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोगपक्षाचे साक्षीदारः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१–नि.क्र.४४ | अनुराधा दिलीप चुंभळकर | साक्षीदार |

### ब. आरोपीचे साक्षीदार, असल्यासः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

### क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यासः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी

### अ. अभियोगपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | – | – |

### ब. आरोपीः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ड. मुद्देमालः–**

| अ.क्र. | वस्तू/आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.17 18:26:42 +0530

दिनांकः १७/०३/२०२६.

(आर. बी. राऊत)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत.
(न्यायालय क्र.२)

# प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की, या पी.डी.एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | आर. बी. राऊत, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (न्यायालय क्र. २) कर्जत, जि.अहमदनगर. |
| लघुलेखकाचे नाव | : | अशोक सुभाष गडदे, लघुलेखक (श्रेणी–३). |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १७.०३.२०२६ |